डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
# कृषि विज्ञान केंद्र, वर्धा (सेलसुरा)
सेलसुरा ता.जि.वर्धा – ४४२१०१ (महाराष्ट्र)

डॉ. जिवन कतोरे
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

मो.क्र. ९९७००७०९४४
ई.मेल.– kvkselsura@pdkv.ac.in / kvk.wardha@gmail.com

## सद्य परिस्थितीत पीक सल्ला

वर्धा जिल्ह्यात ज्या शेतकरी बंधूंची पेरणी जूनच्या अखेरीस झालेली आहे त्यांचे पीक सध्या परिस्थितीत १२ ते १५ दिवसाचे होत आलेले असून मागील ५ ते ६ दिवसापासून पावसाचा खंड पडलेला आहे त्यामुळे आताच घाबरून कोणतीही महागडी फवारणी करण्याची गरज नाही या अवस्थेत जमिनीतील ओलावा टिकवणे आणि मुळांची वाढ चांगली ठेवणे हे सर्वात महत्त्वाचे आहे तरी कृपया शेतकरी बंधूंनी खालील उपाय योजना केल्यास फायद्याचे ठरेल

१) **डवरनी / कोळपणी करा :** जमीन वापस्यावर असल्यास उथळ डवरणी केल्याने वरचा पापुद्रा फुटतो तणांचे नियंत्रण होते आणि जमिनीतील ओलावा टिकण्यास मदत होते अगदी लहान रोपांच्या मुळांना इजा होणार नाही याची काळजी घ्या.

२) **संरक्षित सिंचनाची सुविधा असल्यास :** मातीतील ओलावा खरोखर कमी झाला आणि रोपे दुपारी सतत कोमेजू लागली तर हलके स्प्रिंकलर सिंचन द्यावे.

३) **आवश्यक फवारणी टाळा :** केवळ तीन-चार दिवसाचा खंड असल्यास १९:१९:१९ युरिया पोटॅशियम नायट्रेट किंवा इतर टॉनिक ची तातडीने गरज नाही पाण्याचा ताण ७-१० दिवसांपेक्षा वाढला आणि सकाळच्या वेळी रोपे कोमेजू लागली तर त्यासाठी पीक कमी कालावधीचे असल्यामुळे १९:१९:१९ किंवा पोटॅशियम नायट्रेट (बाष्प अवरोधक ) या द्रावणाची (१%) फवारणी करावी फवारणी सकाळी किंवा संध्याकाळी करावी.

४) **तण नियंत्रण :** पीक वाढीच्या दृष्टीने १२ ते २० दिवसांचा कालावधी तण नियंत्रणासाठी महत्त्वाचा आहे परंतु पीक तीव्र पाण्याच्या ताणात असेल किंवा तापमान खूप जास्त असेल तर पेरणी पश्चात तणनाशकाची फवारणी टाळावी.

ज्या भागामध्ये अत्यल्प पाऊस झाल्यामुळे पेरणीस विलंब झाला किंवा अद्याप पर्यंत पेरणी झाली नसल्यास शेतकरी बंधूंनी खालील बाबी करणे आवश्यक आहे.

- सोयाबीन पिकाची पेरणी उशीर उशिरात उशिरा 23 जुलैपर्यंत करू शकतो परंतु यामध्ये उत्पादनात कमीत कमी १५ ते २० टक्के घट येण्याची संभावना आहे.
- सोयाबीनच्या लवकर अति लवकर परिपक्व होणाऱ्या वाणाचा जसे की जे एस २०-३४, जे एस ९५-६०, जे एस ९३-०५ पिडीकेव्ही अंबा, एम ए यु एस ७२५ इत्यादी समावेश करणे गरजेचे आहे.
- सोयाबीन पिकात हेक्टरी रोपांची संख्या जास्तीत जास्त ठेवणे गरजेचे आहे यासाठी दोन ओळीतील अंतर कमी करून पेरणी करावी (दोन ओळी मधील अंतर ३० सेंटीमीटर ठेवावे) व बियाणे दर वाढवावा.
- सोयाबीन पिकाची बीबीएफ किंवा पट्टा पद्धतीनेच पेरणी करावी. शिफारशीत बीज प्रक्रिया करणे अत्यावश्यक आहे. सोयाबीन मध्ये तुरीचे आंतरपीक घ्यावे.

## कीड व रोग व्यवस्थापन

**सोयाबीन**

✓ सोयाबीन पिकातील पैसा / वाणी / मिलिपीडस किडीच्या व्यवस्थापनासाठी शेतातील पालापाचोळा किंवा वाळलेले कुजलेले काडी कचरा गोळा करुन नष्ट करावा, वाणी रात्री सक्रीय असल्याने रात्रीच्या वेळी शेतात गवताचे ढिग करुन ठेवावेत आणि सकाळी गवताच्या ढिगाखाली जमा झालेले वाणी जमा करून मिठाच्या किंवा साबणाच्या द्रावणात टाकावेत. क्लोरपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) ३७.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझेल ढिले करून रोपांभोवती वर्तुळाकार किंवा सरळ ओळीत ड्रेंचिंग/आवळणी करावी.

✓ गोगलगाय किडीच्या व्यवस्थापनाकरिता १५ टक्के मिठाच्या द्रावणामध्ये गोणपाट बुडवून, १० गोणपाट प्रती एकर याप्रमाणे अंथरावे व दिवसा गोगलगायी गोणपाटाखाली लपण्यासाठी जमा होतात व मिठाच्या संपर्कात येऊन नष्ट होतात किंवा जमा करून नष्ट कराव्यात. चुन्याच्या भुकटीचा ४ इंच पट्टा शेताच्या बांधाच्या शेजारी टाकावा. मेटाअल्डेहाईड २.५ टक्के भुकटी २ किलो प्रती एकर

प्रमाणे रोपांवर/झाडांवर सुरक्षा साधने घालून धुरळणी करावी तसेच धुरळणी केल्यावर ३ ते ४ दिवस ओलीत करू नये व जनावरांना धुरळणी क्षेत्रात चरू देऊ नये.

- ✓ खोडमाशीच्या व्यवस्थापनासाठी पिवळे चिकट सापळे २५ प्रती हेक्टरी याप्रमाणात लावून नियमित खोडमाशीचा प्रादुर्भाव पाहणे. खोडमाशी प्रादुर्भावग्रस्त झाडे, पाने व फांद्या यांचा किडीसकट नायनाट करावा. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत फुलोऱ्यापूर्वी पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. सोयाबीन बियाण्यास बीजप्रक्रिया केली नसल्यास पिक १५ दिवसाचे झाल्यानंतर इथिऑन ५० टक्के प्रवाही १५-३० मी.लि. किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ई.सी. ६.७ मी.लि. किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मी.ली. यापैकी कोणतेही एक कीटकनाशकाची प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**तूर**

- ✓ तूर पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनाकरिता पेरणीनंतर ट्रायकोडर्मा मित्रबुरशी २ किलो/२ लिटर २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या व थोडाफार ओलावा असलेल्या शेणखतामध्ये मिसळवून घमेल्यात घेऊन एक एकर क्षेत्रफळामध्ये समप्रमाणात पसरविणे किंवा फेकून देणे किंवा ट्रायकोडर्मा मित्रबुरशी ५० ते १०० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून ड्रेंचींग/आवळणी करावी.

**कापूस**

- ✓ राखाडी भुंग्याचे व्यवस्थापनासाठी प्रौढ भुंगे गोळा करून नष्ट करावे. यजमान पिकांची विशेषता वांग्याची लागवड शेताजवळ करू नये. बिव्हेरिया बॅसियाना किंवा मेटाराईजियम यासारख्या जैविक कीटकनाशकांची जमिनीवर व पिकांवर फवारणी करावी किंवा शेणखतामध्ये मिसळून शेतात फेकून द्यावे. बायफेन्थ्रीन ८ टक्के अधिक क्लोथीयानिडीन १० टक्के एस.सी. (टॅलस्टार प्लस) हे संयुक्त कीटकनाशक १० मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.
- ✓ मूळकूज व खोडकुज (कॉलर रॉट) रोगाचे व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम १२ टक्के अधिक मॅंकोझेब ६३ टक्के डब्ल्यूपी (साफ) १० ते १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून सरळ रेषेत किंवा बांगडी पद्धतीने ड्रेंचिंग किंवा आवळणी करावी किंवा ट्रायकोडर्मा मित्रबुरशी ५० ते १०० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून ड्रेंचींग/आवळणी करावी.

वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख,
कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा

---

जा.क्र.कृविके/सेल/५३७ /२०२६ दि. १५/०७/२०२६

मा. जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा व मा. संपादक, वर्धा
मा. महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या स्थानिक लोकप्रिय दैनिक वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यात यावी.

**वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख,**
**कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा**